


# ह्या शिकवणीत तुम्ही उषा जानोम बाईंडिंग फुट वापरणे शिकाल.




जेव्हा तुम्हाला कार्यक्षमतेने आणि त्वरित, एकाच टप्प्यात बायस टेप लावायचा असतो, तेव्हा हा फुट अतिशय महत्त्वाचा ठरतो. इथे हा फुट आहे... तुम्ही बघू शकता हा किती गुंतागुंतीचा दिसतो.... आणि हो, तो नक्कीच काही गुंतागुंतीचे फोल्ड्स आणि शिवणकाम करतो – त्यातील अंतर्निहित फनेल फोल्ड करतो आणि बाईंडिंगला कापडाच्या काठावर सुईपर्यंत पोहोचण्याआधी दिशा दाखवतो. तुम्ही विविध प्रकारांचा उपयोग करू शकता – स्ट्रेट स्टीच, झिगझॅग किंवा अगदी डेकोरेटिव्ह स्टीच सुद्धा.

ह्या पाठाकरिता तुम्हाला आवश्यक असलेले साहित्य आहे एक उषा जानोम बाईंडिंग फुट, एक 8 X 8 इंचाचा कपड्याचा तुकडा, 1 इंच रुंदीचा बायस टेप आणि धागे. बायस टेपचे काठ 45 अंशाच्या कोनात कापल्याची खात्री करा.

आता हा आहे बाईंडिंग फुट – बाईंडिंग फुटचा हा भाग पाहा – हे फनेल आहे, जिथून बायस टेप टाकल्या जातो. बायस टेपची रुंदी, अशाप्रकारे, दोन्ही काठांच्यामधील रुंदीइतकीच असावी, आता तुम्हाला लक्षात आलं, काठ 45 अंशांच्या कोनात कापणे का आवश्यक आहे – त्यामुळे टेपला सुरळीतपणे फनेलमध्ये टाकता येतं. जर तुम्हाला खात्री नसेल, तर आत टाकून बायस टेपची रुंदी तपासून घ्या.



साध्या प्रेसर फुटच्या जागेवर तडकून बाईंडिंग फुट लावा.

बायस टेप फुटच्या खाली ठेवून त्याला खाली करा. टेपवर एक साधी शिलाई करा आणि थोडासा धागा मिळवण्यासाठी ओढा – धागा सोडून कापून टाका. आता टेप मशीनमधून काढून टाका.




इथे दिसत असल्याप्रमाणे धागा टाका आणि हळुवारपणे ओढा जेणेकरून बायस टेप फनेलमध्ये जाईल. बायस टेप फनेलमध्ये गेल्यावर, कापड खोबणीत ठेवा. कापड सतत खोबणीत राहील, याची खात्री करा. त्यावर बायस टेप धरून ठेवा.

पॅटर्न सेलेक्टर डायलला स्टीच 'ए' वर सेट करा आणि स्टीचची लांबी 2.5 वर सेट करा. बायस टेपला कपड्यावर सतत धरून ठेवल्याची खात्री करून हळूहळू शिवण्यास सुरुवात करा. खोबणीच्या रेषेत शिवताना कपड्याला दिशा द्या आणि टेपला फनेलच्या रेषेत दिशा द्या. अधिक चांगले शिवता यावे यासाठी आणि तुम्हाला हवी असलेली परिपूर्णता मिळवण्यासाठी तुम्हाला अभ्यास करावा लागेल.



बायस टेपच्या टोकापर्यंत शिवून झाल्यानंतर कापड काढून टाका आणि धागा कापून टाका. बायस टेपच्या दोन्ही टोकांवर असलेले जादा तुकडेसुद्धा कापून टाका.



अगदी थोड्याच वेळात तुमची बाईंडिंग तयार आहे. आणि बघा किती सफाईदारपणे झाली आहे. बाईंडिंग हा सर्वसाधारणपणे रजई-गादी बनवणाऱ्यांचा आवडीचा प्रकार आहे कारण त्याची तिथेच सर्वाधिक गरज असते, परंतु तुम्ही त्याचा वापर कुठेही करू शकता जिथे कपड्यांचे काठ उकलण्यापासून वाचवण्यासाठी बंद करून शिवण्याची आवश्यकता आहे. ह्या कारणाद्वारे तुम्हाला बाईंडिंगचा वापर तिथे करण्यापासून स्वतःला रोखू देऊ नका जिथे तुम्हाला वाटते की ह्यामुळे शोभा वाढेल – तुम्हाला आवडत नसलेले काठ लपवा, सह-साधने, वस्त्रे सजवा आणि बरंच काही करा.
तुम्हाला आश्चर्य होईल की ह्या फुटच्या मदतीने तुम्ही किती सहजपणे वस्तूंचा देखावा बदलू शकता आणि लवकरच चुटकीसरशी तुम्ही हे करू शकाल.